**पोलीस उप-आयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड,प्रेमलोक पार्क,चिंचवड,पुणे - ३३
**दुरध्वनी क्र.** ०२०-२७३५०१२० ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

# प्रेसनोट

## जबरी चोरी, घरफोडी व गहाळ झालेले ६९ मोबाईल असा ७,१०,०००/- लाखांचा मुद्देमाल गुन्हे शाखा, युनिट १ कडुन हस्तगत

पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दीत वाढत्या जबरी चोरी, घरफोडीच्या अनुशंगाने मा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे सो यांनी गुन्हे शाखा युनिट १ चे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर काटकर यांना ठोस कारवाई करण्याचे आदेश दिल्यावरुन सदर प्रकरणाची उकल करणेसाठी पोउपनि इम्रान शेख, पो.अंमलदार फारुक मुल्ला, प्रमोद हिरळकर, उमाकांत सरवदे, स्वप्नील महाले, मारुती जायभाय, विशाल भोईर असे पथक नेमुन सदर प्रकरणांची उकल करुन वाढत्या जबरी चोरी व घरफोडीच्या गुन्हयांना आळा घालण्याबाबत आदेश देण्यात आले होते.

पोउपनि शेख व पथक यांनी सदर गुन्हयांच्या अनुषंगाने समांतर तपास करता सदर पथकास बातमीदारामार्फत संशयीत इसमांबाबत खात्रीशीर माहिती मिळाली. सदर बातमीची शहनिशा करता इसम नामे **१) सोमा दुर्गप्पा चौधरी, वय १९ वर्षे, रा. ७८६/मुन्नाभाई चाळ, पवार पेट्रोलपंप जवळ, नेहरुनगर, पिंपरी, पुणे, २) मुदस्सर अहमद सय्यद, वय-२१ वर्षे, रा ४२०/४०१८, वल्लभनगर, बॅडमिंटन हॉल जवळ, पिंपरी, पुणे व एक विधी संघर्षीत बालक** यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे चौकशी करता त्यांनी भोसरी एम.आय.डी.सी अंतर्गत ०७ व सांगवी पोलीस ठाणे अंतर्गत ०२ गुन्हे केल्याचे उघड झाले. त्यांच्याकडुन पोलीस ठाणेस दाखल असलेल्या जबरी चोरीच्या गुन्हयांतील २३ मोबाईल जप्त करुन एकुण ०८ जबरी चोरी व ०१ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या सहाय्याने चिखली, भोसरी व भोसरी एम.आय.डी पोलीस ठाणे अंतर्गत गहाळ नोंद असलेले मोबाईल पैकी ४६ मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. अदयापपर्यत १८ मोबाईल, मुळ मालकांना परत करण्यात आले असुन उर्वरीत मोबाईल त्यांचे् मालकांना परत देण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर कारवाई दरम्यान विविध कंपनीचे एकुण **६९ मोबाईल असा रु ७,१०,०००/-** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली तत्कालीन वरीष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर काटकर, वपोबनि संजय तुंगार (सायबर गुन्हे), पोलीस उपनिरीक्षक इम्रान शेख पो.अंमलदार फारुक मुल्ला, प्रमोद हिरळकर, उमाकांत सरवदे, स्वप्नील महाले, मारुती जायभाय, विशाल भोईर व तांत्रिक विश्लेषक नागेश माळी यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
**पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा)**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,पुणे**

Scanned with OKEN Scanner